म्हाडा
MHADA

# महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा)
## जनसंपर्क विभाग

=====================================================================

जा.क्र.जसंवि/प्रसिद्धी पत्रक/१५७८ दि.२८/१०/२०२०

<u>प्रसिद्धी पत्रक</u>

ना. म. जोशी मार्ग-लोअर परळ बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्प

# संक्रमण गाळ्यात स्थलांतरीत २७२ पात्र भाडेकरूंना प्रस्तावित पुनर्वसन इमारतींमधील सदनिका निश्चितीसाठी ०३ नोव्हेंबर रोजी कार्यक्रम

म्हाडाच्या मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातर्फे दक्षिण मुंबईतील बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याअंतर्गत ना. म. जोशी मार्ग-लोअर परळ येथे उभारण्यात येणाऱ्या प्रस्तावित पुनर्वसन इमारतींमध्ये म्हाडा संक्रमण गाळ्यात स्थलांतरीत झालेल्या २७२ पात्र भाडेकरूंना वितरित करावयाच्या पुनर्वसन सदनिका संगणकीय प्रणालीद्वारे निश्चितीसाठी मंगळवार, दि. ०३ नोव्हेंबर, २०२०रोजी दुपारी ३.०० वाजता कार्यक्रमाचे आयोजन म्हाडा मुख्यालयात करण्यात आले आहे.

सदनिका निश्चितीच्या कार्यक्रमाचा शुभारंभ राज्याचे गृहनिर्माण मंत्री श्री. जितेंद्र आव्हाड यांच्या हस्ते केला जाणार असून मुंबई शहराचे पालकमंत्री श्री. अस्लम शेख, मुंबई उपनगरचे पालकमंत्री श्री. आदित्य ठाकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम होणार आहे. तसेच या कार्यक्रमाला गृहनिर्माण राज्यमंत्री श्री. सतेज पाटील, मुंबईच्या महापौर श्रीमती किशोरी पेडणेकर, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाचे सभापती श्री. विनोद घोसाळकर, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळाचे सभापती श्री. विजय नाहटा, गृहनिर्माण विभागाचे प्रधान सचिव श्री. एस. व्ही. आर. श्रीनिवास, 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.अनिल डिग्गीकर, मुंबई मंडळाचे मुख्य अधिकारी डॉ. योगेश म्हसे, माजी आमदार श्री. सचिन अहिर, माजी आमदार श्री. सुनील शिंदे आदी उपस्थित राहणार आहेत.

बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्प हा देशातील सर्वात मोठा नागरी पुनरुत्थान प्रकल्प असून या प्रकल्पाची जबाबदारी शासनाने म्हाडाकडे सोपविली आहे. कोविड-१९ विषाणूच्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर म्हाडातर्फे या कार्यक्रमाचे लाईव्ह वेबकास्टिंग (Live Webcasting) (थेट प्रक्षेपण) **http://mhada.ucast.in** या लिंकवर उपलब्ध करून देण्यात येणार आहे तसेच म्हाडाचे अधिकृत संकेतस्थळ **https ://mhada.gov.in** वर देखील थेट प्रक्षेपणाकरिता वेबकास्टिंगची लिंक उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या ऑनलाईन प्रणालीच्या माध्यमातून प्रस्तावित पुनर्वसित इमारतींमध्ये वितरित करण्यात येणाऱ्या सदनिकेचा निकाल सर्व संबंधितांनी पहावा, असे आवाहन मुंबई मंडळातर्फे करण्यात येत आहे.

P.T.O.

दि. ११ सप्टेंबर, २०१९ रोजी उच्चस्तरीय समितीच्या संयुक्त बैठकीत व मा. मुख्यमंत्री महोदयांनी दि. २४ फेब्रुवारी, २०२० रोजीच्या संयुक्त बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार ना. म. जोशी मार्ग-लोअर परळ बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पातील पात्र लाभार्थ्यांसाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. ना. म. जोशी मार्ग-लोअर परळ येथील बीडीडी चाळीत एकूण ३३४४ रहिवाशी असून त्यांची पात्रता निश्चित करणे व तद्नुषंगिक बाबींसाठी सक्षम प्राधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (अतिक्रमण / निष्कासन) कुलाबा विभाग, मुंबई शहर यांची शासनाने नियुक्ती केली आहे. अद्यापपर्यंत १० चाळींतील ८०० भाडेकरूंचे पात्रतेबाबत सर्वेक्षण करण्यात आले असून ६०७ भाडेकरू आतापर्यंत पात्र ठरले आहेत. संक्रमण गाळ्यात स्थलांतरित होण्यासाठी आतापर्यंत म्हाडाने पात्र भाडेकरूंपैकी ३१४ भाडेकरूंशी जागेवरच करारनामा पंजीकृत करून घेतला असून यापैकी २७२ भाडेकरू संक्रमण गाळ्यात स्थलांतरित झाले आहेत.

जुन्या चाळीतून संक्रमण गाळ्यात घरातील सामानासह स्थलांतरणासाठी म्हाडातर्फे निःशुल्क वाहन व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच संक्रमण गाळ्याच्या ऑनलाईन नोंदणीसाठी स्टॅम्प ड्युटी व नोंदणी शुल्कही 'म्हाडा'तर्फे भरण्यात येत आहे. संक्रमण गाळ्यात स्थलांतरित भाडेकरूंकडून कुठलेही सेवा शुल्क म्हाडातर्फे घेण्यात आलेले नाही. मात्र, वीज बिल हे भाडेकरूंनी भरावयाचे आहे.

**(वैशाली गडपाले)**
**मुख्य जनसंपर्क अधिकारी / म्हाडा**

===========